# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### उसर (ता.अलिबाग,जि.रायगड) येथील औद्योगिक प्रकल्पासाठी संपादित जमिनीचा वाढीव मोबदला देण्याबाबत

**(१) १०८२७ (०२-१२-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उसर (ता.अलिबाग,जि.रायगड) येथील औद्योगिक (एम.आय.डी.सी.) प्रकल्पासाठी सन १९८६ मध्ये नोटीसा बजावून मौजे मल्याण येथील सुमारे २०० जमीनधारकांच्या जमिनी ह्या एक हेक्टर रुपये १,२०,०००/- या कमी दरात जमीनधारकांकडून सदर प्रकल्पासाठी संपादित करुन त्याचा मोबदला सन १९९२ मध्ये देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा वाढीव दराने मोबदला मिळण्यासाठी १४४ जमीन धारकांनी लोकन्यायालयात तसेच मा.न्यायालयात अपिल दाखल केले होते, त्यानुसार त्यांना पहिल्या टप्प्यातील वाढीव दराने मोबदला देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकन्यायालयात तसेच मा.न्यायालयात अपील दाखल न करणाऱ्या उर्वरीत ५६ प्रकल्पधारकांना त्यांच्या संपादित करण्यात आलेल्या जमिनीचा पहिल्या टप्प्यातील वाढीव दराने मोबदला सदर प्रकल्पाकडून देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ५६ प्रकल्पधारकांना त्यांच्या जमिनाच्या पहिल्या टप्प्यातील वाढीव दराने मोबदला मिळावा यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२१-०३-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या उसर औद्योगिक क्षेत्राकरीता मौजे मल्याण, कुणे, खानाव, व ऊसर, येथील जमीनी संपादन करण्यात आल्या असून. दिनांक ३०/०४/१९९४ रोजी अंतिम निवाडा घोषित करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) होय हे खरे आहे.

मा.जिल्हा न्यायालय अलिबाग यांनी १४४ खातेदारांना भूसंपादन कायदा १८९४ मधील कलम १८ खालील दिलेल्या निर्णयाचा आधार घेऊन उर्वरीत ५६ खातेदारांनी मुदतीत २८ अ खाली वाढीव नुकसान भरपाई मिळण्याबाबत दावे दाखल करणे आवश्यक होते. या ५६ खातेदारांना मा.न्यायालयाने दिलेला दर मान्य असल्याने तडजोडीने दावे निकाली काढण्याबाबत मा.लोकन्यायालयामार्फत उपविभागीय अधिकारी अलिबाग व म. औ. वि. महामंडळाच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्हयासह संपूर्ण राज्यात रोजगार देणाऱ्या औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या बंद पडल्याने हजारो कामगार बेरोजगार झाले असल्याबाबत

**(२) १०८३४ (१३-११-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयासह संपूर्ण राज्यात रोजगार देणाऱ्या औद्योगिक क्षेत्रातील अनेक लहान-मोठ्या कंपन्या मागील काही वर्षात तसेच कोरोना संकट आणि ताळेबंदीमुळे बंद पडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हयात औद्योगिक क्षेत्रातील खालापूर तालुक्यातील साजगांव-ढेकू व रसायनी-पाताळगंगा, सावरोली-कुंभिवली तसेच मोता हायकल्स, ओरके लिमिटेड, ॲमफोर्स लिमिटेड या कंपन्या बंद पडलेल्या असताना केडीएल बायोटेक, झेनिथ बिर्ला स्टीलसह १६ मोठ्या आणि १३२ च्या वर लहान कंपन्या कायमच्या बंद झाल्या असल्यामुळे हजारो कामगार बेरोजगार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बंद कंपन्यातील कामगार आपल्या हक्काची देणी मिळण्यासाठी आंदोलने करून तसेच, झेनिथ बिर्ला कंपनीच्या कामगारांनी मागील ३ वर्षापासून आझाद मैदानात साखळी उपोषण/आंदोलन करूनही त्या कामगारांना न्याय मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंद पडलेल्या उद्योग व्यवसायांना/ कंपन्यांना पुनर्जिवित करण्याबाबत तसेच, कंपनी बंद पडल्यामुळे बेरोजगार झालेल्या कामगारांना रोजगार उपलब्ध करून देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२१-०३-२०२२) :** (१) कोरोना विषाणूचा प्रार्दुभाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून, साथ रोग अधिनियम, १८९७ चे कलम (२) तसेच आपत्ती व्यवस्थापन नियम २००५ अंतर्गत संपूर्ण राज्यात टाळेबंदी लावण्याचा निर्णय दिनांक २३ मार्च, २०२० च्या आदेशान्वये घेण्यात आला. त्यानुसार राज्यातील अत्यावश्यक सेवा वगळता, उर्वरित सर्व उद्योग, कार्यालये, शिक्षण संस्था, सेवा, इ. दिनांक २५ मार्च, २०२० पासून बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.तसेच टाळेबंदीबाबत दिनांक २५ मार्च, २०२० च्या आदेशान्वये राज्य शासनाने मार्गदर्शक तत्वे निर्गमित करुन टाळेबंदीच्या कालावधीत अत्यावश्यक तसेच वैद्यकीय सेवेशी संबंधित उद्योगधंदे / सेवा वगळता उर्वरित सर्व उद्योगधंदे, शासकीय कार्यालये, शिक्षण संस्था, दुकाने इत्यादी बंद ठेवण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. तद्नंतर पुनश्च: प्रारंभ अभियान अंतर्गत दिनांक ३१ मे, २०२० च्या आदेशान्वये कोरोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करुन, टप्प्याटप्प्याने टाळेबंदीचे निर्बंध शिथिल करणे व उद्योग, कार्यालये, सेवा, इ. मर्यादित

कर्मचारी / कामगार यांच्या उपस्थितीत सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. सद्य:स्थितीत सर्व उद्योग, कार्यालये, सेवा, इ. सुरु आहेत.

(२) रायगड जिल्ह्यामध्ये माहे मार्च, २०२० ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीत बंद पडलेल्या कारखान्यांची संख्या २५९ असून, त्यामुळे १८६५८ कामगार परिणामित झाले आहेत. तसेच रायगड जिल्ह्यात सन २०१९ ते ऑक्टोबर, २०२१ अखेर २९ कंपन्या बंद झाल्या असून १७८० कामगार परिणामित झालेले आहेत.

(३) मे. झेनिथ बिर्ला व्यवस्थापनाने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१३ ची नोटीस देऊन दिनांक १२ डिसेंबर, २०१३ पासून टाळेबंदी जाहीर केलेली असून, त्यामुळे २२९ कामगार, कर्मचारी परिणामित झाले आहे. या कामगारांनी आपल्या मागणीकरिता आझाद मैदान व दलमल हाऊस, मुंबई येथे उपोषण / आंदोलन केले होते.

व्यवस्थापनाने टाळेबंदी जाहीर केल्यानंतर कामगार आयुक्त कार्यालयाने मध्यस्थी करुन दिनांक १९ डिसेंबर, २०१३, दिनांक १६ जानेवारी, २०१४, दिनांक ३० जानेवारी, २०१४, दिनांक १७ सप्टेंबर, २०१६, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६, दिनांक १८ एप्रिल, २०१७ व दिनांक ८ जून, २०१७ रोजी बैठका घेतल्या आहेत. मा.मंत्री (कामगार) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकांमध्ये व्यवस्थापन व कामगार प्रतिनिधी यांचेमध्ये समेट होण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न केले आहेत. तथापि, बहुतांश वेळा व्यवस्थापन प्रतिनिधी चर्चेस गैरहजर राहिलेले आहेत.

(४) उक्त प्रकरणी व्यवस्थापनाने दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी टाळेबंदी जाहीर केली आहे. त्यानुषंगाने कामगारांनी मा.औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे युएलपी क्रमांक ७०/२०१६ दाखल केली असून, सद्य:स्थितीत हे प्रकरण पुराव्यांची नोंद घेण्यासाठी (Evidance Recording) ठेवण्यात आले आहे.

बंद पडलेल्या / आजारी लघु व मध्यम उद्योग घटकांना पुनर्जिवित करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ अन्वये "विशेष अभय योजना" राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत शासकीय देणींची मुद्दल रक्कम एकरकमी जमा केल्यास, त्यावरील व्याज, दंडव्याज माफ करुन, उद्योग घटकाची स्थिर मालमत्ता अन्य उद्योग घटकाकडे हस्तांतरीत करता येते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनांतर्गत बेरोजगार युवक/ युवतींना स्वयंरोजगाराकरीता शासनामार्फत अनुदानित कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

तसेच कोविड-१९ पश्चात उद्योग वाढीसाठी राज्यशासनामार्फत "महापरवाना / जलद ना-हरकत परवाने उपलब्ध करणे" जोडा व वापरा (Plug and Play), एकत्रित शोध (Unified Search), लवचिकता प्रस्तावित करणे (Building Resiliency ) तसेच गुंतवणूक समन्वयन अधिकारी, इ. बाबींचा समावेश आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जातीच्या गरीब व वंचित घटकासाठीच्या उन्नतीसाठी विविध योजनांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३) १०८६७ (१९-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाव्दारे अनुसूचित जाती व वंचित घटकाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी ५९ प्रकारच्या विविध कल्याणकारी योजना बार्टी व्दारे राबविण्यात येत असून त्यांना अद्याप अनुदान प्राप्त न झाल्याने सदर योजना बंद पडल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुसूचित जातीच्या गरीब व वंचित घटकांच्या उन्नतीसाठी सदर योजनांना तातडीने निधी उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२१-०३-२०२२) :** (१) बार्टी मार्फत अनुसूचित जाती प्रवर्गाकरीता राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी या विभागाकडून दिनांक १३ सप्टेंबर २०२१ रोजी बार्टी कार्यालयाकडे निधी वितरित करण्यात आलेला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बहुल (जि.वर्धा) गावाच्या विकासाकरिता ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर आलेल्या निधीबाबत

**(४) १०८६८ (१९-११-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहुल (जि.वर्धा) गावाच्या विकासाकरिता ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामाच्या निधीची रक्कम रुपये ७० लाख अद्याप मिळाली नसल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बहुल (जि.वर्धा) गावाच्या विकासाकरिता ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेंतर्गत त्वरित निधी उपलब्ध व्हावा यादृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपायोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**ॲड. के.सी.पाडवी (१४-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना विभागाचे दिनांक २०/०१/२०२१ रोजीचे शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर वर्ग करण्यात आलेली आहे. मात्र सदर योजनेंतर्गत यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या व प्रगतीपथावरील कामांचे प्रलंबित दायित्व पूर्ण होईपर्यंत पूर्वीप्रमाणे जिल्हा स्तरावरुन तरतूद करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुषंगाने जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम २०२१-२२ मध्ये वर्धा जिल्ह्यासाठी रुपये १.०७ कोटी इतकी तरतूद ठेवण्यात आलेली आहे. सदर निधीमधून वर्धा जिल्ह्यातील सन २०१६-१७ पासूनचे ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेचे प्रलंबित दायित्व देण्याची कार्यवाही प्रकल्प अधिकारी, वर्धा यांचे स्तरावरुन करण्यात येत आहे.

---

## राज्यातील दिव्यांग, मूकबधिर विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयीन शिक्षणासाठी जिल्हानिहाय ज्युनियर कॉलेज सुरु करण्याबाबत

**(५) १०८९६ (२०-११-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांग, मुकबधिर विद्यार्थ्यांसाठी फक्त ४ थी, ७ वी व काही ठिकाणी १० वी पर्यंत शाळा सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण झाल्यानंतर पुढील शिक्षणाची सोयी-सुविधा उपलब्ध नसल्यामुळे ही मुले प्रवाहाच्या बाहेर पडतात त्यासाठी प्रत्येक जिल्हानिहाय पुढील शिक्षणासाठी कनिष्ठ महाविद्यालय सुरू करावे यासाठी वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील मूकबधिर मुलांना पुढील शिक्षणासाठी जिल्हानिहाय ज्युनियर कॉलेज सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-०३-२०२२) : (**१) होय.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये पुणे, अमरावती, नागपूर, मुंबई, लातूर येथे मूकबधीर मुलांसाठी स्वंतत्ररित्या ज्युनिअर कॉलेज सुरु असून सदरहू कॉलेज मधून मूकबधीर विद्यार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत.

राज्यस्तरीय कर्णबधीर असोसिएशन या संघटनांकडून प्रत्येक महसूल विभागाच्या ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालय सुरु करणेबाबतची मागणी होत आहे.

त्यानुषंगाने राज्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कनिष्ठ महाविद्यालय स्थापन करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

# राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या विनाअनुदानित तत्त्वावर सुरू असलेल्या १२३ दिव्यांग शाळांना १००% अनुदान देण्याबाबत

**(६) १०९४० (२०-११-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या १२३ दिव्यांग शाळांना सन २०१७ रोजी वा त्यादरम्यान ५०% अनुदान शासनाने सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास गत अनेक वर्षे या शाळेतील कर्मचारी हे अर्ध्या पगारावर काम करत असल्याने त्यांच्यामध्ये असंतोषाचे वातावरण झाले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर १२३ शाळांना १०० % अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१५-०३-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) होय.

विमाशी संघ व दिव्यांग शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघ, नागपूर यांनी केलेल्या आंदोलनाच्या अनुषंगाने प्र.स.(सा.न्या.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४/०२/२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीमध्ये १२३ विशेष शाळेतील कर्मचाऱ्यांना ५० टक्के वेतन अनुदानाऐवजी १०० टक्के वेतन अनुदान सुत्र लागू करण्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास सादर करणेबाबत दिव्यांग कल्याण आयुक्तालयास निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सामाजिकदृष्ट्या मागास, अनुसूचित जाती, जमातीतील आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी दिली जाणारी शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याबाबत

**(७) १०९४१ (२०-११-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिकदृष्ट्या मागास, अनुसूचित जाती, जमातीतील आणि इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शासनाच्या विविध विभागांकडून दिली जाणारी शिष्यवृत्ती विविध कारणामुळे गेल्या काही वर्षात मिळालेली नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सामाजिकदृष्ट्या मागास, अनुसूचित जाती, जमातीतील आणि इतर मागास वर्गातील विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यासाठी संबंधित विभागाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२१-०३-२०२२) :** (१) केवळ अ.जा. प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही बाब खरी आहे.

(२) सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्तीकरीता ऑनलाईन प्राप्त झालेल्या अ.जा. प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या अर्जांपैकी ३,८४१ इतके अर्ज महाविद्यालय व जिल्हास्तरावरुन नामंजूर करण्यात आले. तसेच ५९,३४६ इतके अर्ज विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉग-ईन मधून रददबातल केले आणि २१,३३१ अर्ज विद्यार्थ्यांना दुरुस्ती, कागदपत्र पुर्तता इ. करण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावरुन विद्यार्थ्यांना परत पाठविण्यांत आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

## दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी मतिमंद प्रवर्गाची जिल्हानिहाय निवासी कार्यशाळा सुरू करण्याबाबत

**(८) १०९४३ (२०-११-२०२१) डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम** : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी संपूर्ण राज्यामध्ये मतिमंद प्रवर्गाच्या ४ ते ५ निवासी कार्यशाळा आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी मतिमंद प्रवर्गाच्या निवासी कार्यशाळा जिल्हानिहाय सुरू करण्याबाबत सर्व स्तरातून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मतिमंद प्रवर्गाची जिल्हानिहाय निवासी कार्यशाळा सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (२१-०३-२०२२) : (**१) नाही.

राज्यामध्ये मतिमंद प्रवर्गाच्या निवासी ३० व अनिवासी ३६ अशा एकूण ६६ कार्यशाळा कार्यरत आहेत.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ओबीसींचे आरक्षण मिळवून देण्यासाठी इम्पेरिकल डेटा गोळा करण्यासाठी शासनाकडून निधी व मनुष्य बळ उपलब्तेबाबत

**(९) १०९५२ (१९-११-२०२१) श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी,**

**श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षण रद्द केल्यानंतर राज्य शासनाने निवृत्त न्यायमूर्ती श्री.आनंद निरगुडे यांच्या अध्यक्षतेखाली माहे जून, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ओबीसींचे आरक्षण पुन्हा मिळवून देण्यासाठी आवश्यक असलेला इम्पेरिकल डेटा गोळा करण्यासाठी मागासवर्गीय आयोगाला डेडिकेटेड कमिशनचा दर्जा देऊन मागासवर्ग आयोगाचे गठण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य मागासवर्ग आयोगाने इम्पेरीकल डेटा गोळा करण्यासाठी मनुष्यबळ व इतर साधनसामुग्रीसाठी ४३१ कोटी रुपये एवढया निधीची मागणी माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे करुनही अद्याप एक रुपयाचाही निधी आयोगाला न मिळाल्याने तसेच शासनाने इम्पिरिकल डाटा गोळा करण्याचा अध्यादेश काढून चार महिने झाले परंतु कामास सुरुवात झाली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयोगाकडून इम्पेरिकल डेटा न्यायालयाला सादर केल्याशिवाय ओबीसींना आरक्षण मिळू शकणार नाही, असे असताना सुध्दा राज्य शासनाने आयोगाला मनुष्यबळ व निधी न दिल्यामुळे अद्यापपर्यंत इम्पेरिकल डेटा संकलीत करण्याचे काम सुरू झाले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्य शासनाच्या या अक्षम्य दिरंगाईमुळे ओबीसी आरक्षण मिळवण्यात प्रचंड विलंब लागत असून आयोगाला मागणीप्रमाणे तातडीने मनुष्यबळ व निधी उपलब्ध करुन देता यावा याबाबत शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.विजय वडेट्टीवार (०७-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) आयोगाने त्यांचेवर सोपविलेले कामकाज पार पाडण्यासाठी रुपये ४३५ कोटीचे संभाव्य अंदाजपत्रक तयार करुन शासनास रुपये ५ कोटीची प्रथम मागणी केली. सदर बाब शासनाच्या विचाराधिन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बंजारा समाजाचे अनुसूचित जमाती प्रवर्गात ST-B समावेश करण्याबाबत

**(१०) १०९७४ (१९-११-२०२१) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ५८२० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील बंजारा समाज विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गात समाविष्ट असून तेलंगणा व आंध्रप्रदेशमध्ये त्यांचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश आहे तर कर्नाटक राज्यात अनुसूचित जातीमध्ये समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात ST-B समावेश करण्याबाबत वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये ST-B समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१४-०३-२०२२) :** (१) होय
(२) बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत मागणी होत आहे.

(३) बंजारा समाजाचा महाराष्ट्र राज्यासाठीच्या अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्याबाबत दिनांक १२ जून, १९७९ च्या पत्रान्वये केंद्र शासनास शिफारस करण्यात आली होती. केंद्र शासनाने दिनांक २६ फेब्रुवारी, १९८१ च्या पत्रान्वये एखाद्या जमातीचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यासाठी १) प्राथमिक अवस्थेतील जीवन राहणी, २) भिन्न संस्कृती, ३) भौगोलिक वेगळेपणा, ४) सर्वसाधारण समाजाशी संपर्क ठेवण्यातील बुजरेपणा व ५) मागासलेपणा हे निकष निश्चित केले आहेत. सदर निकषांची बंजारा समाज पुर्तता करीत नसल्याने दिनांक ६ नोव्हेंबर, १९८१ च्या पत्रान्वये सदर शिफारस मागे घेण्यात आली होती. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २६ जुलै, २०१९ च्या पत्रान्वये अनुसूचित जमातीत समावेश करण्याकरीता निर्धारीत केलेले निकष महाराष्ट्र राज्यातील बंजारा समाज पूर्ण करीत नसल्याचा अहवाल सादर केला आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता, अनुसूचित जमातीत समावेश करण्याकरीता निर्धारीत करण्यात आलेले निकष बंजारा समाज पूर्ण करीत नसल्याने बंजारा समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत शिफारस करता येणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्व.वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाला अनुदानासाठी निधी वितरित करणेबाबत

**(११) १०९७५ (१९-११-२०२१) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ५८२५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्व.वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळाला अनेक वर्षापासून अनुदान कमी प्रमाणात दिले जात असून काहीवेळा काहीच अनुदान दिलेले नाही तसेच यामधील लाभार्थ्यांची हजारो प्रकरणे प्रलंबित असून त्यांना लाभ मिळत नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयान्वये वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळास प्राप्त झालेला रुपये ३०.०० कोटी निधीचा विनियोग महामंडळातील विविध योजना राबविण्यासाठी केलेल्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त महामंडळाला सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता भरीव अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (१४-०३-२०२२) :** (१) अंशत: खरे

सन २०१९-२० १) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (बँकेमार्फत)(कर्ज मर्यादा रुपये १०.०० लाखापर्यंत) २) गट कर्ज व्याज परतावा योजना (बँकेमार्फत)(कर्ज मर्यादा रुपये १०.०० लाख ते रुपये ५०.०० लाख) या दोन्ही योजना विभागाच्या शा.नि.क्र.वनाम २०१९/ प्र.क्र.५६/महामंडळे, दिनांक २३/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ३०.०० कोटी इतके सहाय्यक अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

(२) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकडे १) वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना या योजनेंतर्गत आतापर्यंत एकूण ९९१० आणि २) गट कर्ज व्याज परतावा योजनेंतर्गत एकूण १३७ असे एकूण १०,०४७ एवढे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर प्रकरणांपैकी त्रुटी अभावी काही प्रकरणे प्रलंबित आहेत. परिपूर्ण असलेले कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली लाभार्थी निवड समितीमध्ये मंजूरीसाठी ठेवण्यात आले आहे.

लाभार्थी निवड समितीमध्ये मंजूर एकूण १८९४ कर्ज प्रकरणांना मुख्यालयामार्फत बँक कर्ज मंजूरीसाठी सशर्त हेतूपत्र देण्यात आले आहेत.

त्यानुसार आतापर्यंत विविध बँकांनी २५ कर्ज प्रस्तावांना बँकेने मंजूरी दिली आहे. त्यापैकी ५ कर्ज प्रस्तावांना व्याज परतावा रक्कम ही थेट लाभार्थींच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाला सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता अनुदान देण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य साहित्य संस्कृती मंडळ व मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या पुनर्रचनेबाबत

**(१२) १०९८४ (१९-११-२०२१) श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ६३५३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांची पुनर्रचना करणेबाबतची शासनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यवाहीनुसार राज्य साहित्य व संस्कृती मंडळ आणि मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ ही दोन्ही महत्वाची मंडळे पुनर्रचनेसाठी वर्षभरानंतरही प्रतिक्षा यादीमध्येच असल्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राला समजून घेणाऱ्या साहित्यिकांची अध्यक्षपदी नेमणूक व्हावी अशी मागणी शासनाकडे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ आणि मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ या मराठी विषयक मंडळाची तातडीने पुनर्रचना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.सुभाष देसाई (३०-०३-२०२२) :** (१) ते (३) महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ आणि महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाच्या पुनर्रचनेबाबत अध्यक्षांच्या नियुक्तीसह शासनाची कार्यवाही पूर्ण झाली आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील आश्रम शाळांना अनुदान देण्याबाबत

**(१३) ११०३६ (०९-१२-२०२१) श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रम शाळांना अनुदान मिळत नसल्याने अनेक आश्रमशाळा चालविणे कठीण झाले आहे, आश्रमशाळांना अनुदान मिळत नसल्याने मुला-मुलींना शैक्षणिक सोयी-सुविधा मिळत नाही हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील निवासी व अनिवासी आश्रमशाळांना अनुदान त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१६-०३-२०२२) :** (१) नाही.

विभागांतर्गत स्वयंसेवी संस्था संचलित अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आश्रमशाळा ही योजना राबविली जाते. सदर योजनेंतर्गत राज्यात १० प्राथमिक व ९ माध्यमिक अशा एकूण १९ अनुसूचित जाती आश्रमशाळा कार्यरत आहेत.

तसेच, शाहू, फुले, आंबेडकर योजनेंतर्गत अनुदान जाहीर करण्यात आलेल्या १६५ आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील आश्रमशाळा व महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी तथा प्राध्यापकांची वार्षिक वेतनवाढ व नियमित वेतन तसेच शाळा महाविद्यालयातील अनुसूचित जाती जमाती तथा ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(१४) ११०५० (१९-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील विविध आश्रमशाळा व महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी तथा प्राध्यापकांची वार्षिक वेतनवाढ व नियमित वेतन तसेच शाळा महाविद्यालयातील अनुसूचित जाती जमाती तथा ओबीसी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रकरणे समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी हेतुपूरस्सर रोखून ठेवली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अुनषंगाने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना वार्षिक वेतन व नियमित वेतन व अनुसूचित जाती, जमाती तथा ओबीसी यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (२१-०३-२०२२) :** (१) नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील विविध आश्रमशाळा व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तथा प्राध्यापकाची नियमित वेतनवाढ तथा नियमित वेतन अदा करण्यात आले आहेत. ते हेतुपुरस्सर किंवा कोणत्याही कारणास्तव रोखण्यात आलेले नाहीत.

नागपूर जिल्ह्यातील आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे माहे सप्टेंबर महिन्यातील वेतन देयक तयार करण्यात आले असून सेवार्थ प्रणालीमध्ये BDS जनरेट करतांना तांत्रिक अडचण निर्माण होत आहेत.

माहे नोंव्हेंबरचे वेतन सादर करण्याबाबत सर्व मुख्याध्यापकांना कळविण्यात आले आहे. नोव्हेंबरच्या वेतनाकरीता BDS प्रणालीवर रुपये ४३ लक्ष शिल्लक असून नोव्हेंबरचे वेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ओबिसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृतीसाठी दिनांक ०१/१०/२०१८ पासून महाडीबीटी पोर्टल कार्यान्वित केले आहे. महाडीबीटी प्रणालीव्दारे ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या दिनांकात वारंवार मुदतवाढ होत असतात तसेच त्रुटी पूर्ततेकरीता महाविद्यालयास रिवर्ड केलेल्या अर्जांचे महाविद्यालयाव्दारे त्रुटीपूर्तता न करता वारंवार अर्ज सहाय्यक आयुक्त कार्यालयास सादर करण्यात येत आहेत.

जिल्हयातील महाविद्यालयातील प्राचार्य यांच्या समवेत वेळोवेळी बैठका आयोजित करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्गासाठी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थाचे (महाज्योती) मुख्यालय नागपूर येथे सुरू करण्याबाबत

**(१५) ११०५३ (१९-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्गासाठी स्थापन करण्यात आलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थाचे (महाज्योती) मुख्यालय दीक्षाभूमीजवळील सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालय परिसरात तात्पुरते सुरु करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील हजारो मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाज्योतीचा लाभ घेता यावा यासाठी नागपूर येथेच नवीन जागा शोधावी अशी मागासवर्गीय विद्यार्थ्यांची मागणी असल्याचे माहे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने महाज्योतीसाठी नवीन प्रशासकीय इमारतीसाठी नागपूर येथेच जागा शोधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार (०८-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महाज्योती कडून शासकीय आणि नागपूर सुधार प्रन्यास च्या मालकीच्या खालील जागेचा शोध घेऊन त्याच्याकडे जागा/जमीन उपलब्ध करुन देण्याकरिता विनंती करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी नागपूर यांच्याकडे दुग्धउप्तादन (डेअरी) विभागाची जागा प्राप्त करण्याकरीता कार्यवाही सुरू आहे. तर नागपूर सुधार प्रन्यास कडून उमरेड रोड वरील मौजा गोन्ही येथील १ हेक्टर जागा उपलब्ध करुन दिल्याचे कळविण्यात आलेले आहे. सदर जागा महाज्योतीच्या गरजेपेक्षा फारच कमी असल्याने पुन्हा जास्तीची जागा उपलब्ध करुन देण्यास नागपूर सुधार प्रन्यास कडे विनंती करण्यात आलेली आहे. या शिवाय इतरही शासकीय जागांचा शोध सुरू आहे.
(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील विदर्भात औद्योगिक क्रांती आणणाऱ्या पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्स प्रकल्पाचा शासनाकडे अहवाल पाठविण्याबाबत

**(१६) ११०५५ (१९-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्स प्रकल्पासाठी उमरेड व बुटीबोरी येथे जागा निश्चित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी टेक्नो फिजिबिलिटी अहवाल तात्काळ तयार करण्याचे निर्देश देण्यात आले होते, मात्र अनेक महिने होऊनही अद्याप हे निर्देश कागदावरच आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने विदर्भात औद्योगिक क्रांती आणणाऱ्या या प्रकल्पाचा तातडीने अहवाल तयार करुन हा प्रकल्प साकार करण्यासाठी केंद्र सरकारकडे आग्रह धरण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.सुभाष देसाई (२१-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोराडी (जि.नागपूर) वीज प्रकल्पाला निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरवून गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(१७) ११०७२ (१९-११-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, डॉ.सुधीर तांबे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोराडी (जि.नागपूर) वीज प्रकल्पाला वेकोलीच्या गोंडेगाव (ता.पारशिवनी) खाणीतून कोळसा पुरवठा केला जातो, खाणीतील कोळसा कोल वॉशरीजमध्ये जात असून नंतर वीज प्रकल्पात आणला जातो, दरम्यान पुरवठादारांनी यात गैरव्यवहार करुन निकृष्ट दर्जाचा कोळसा वीज प्रकल्पाला पुरविल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोराडी (जि.नागपूर) येथील औष्णिक विद्युत केंद्राला पुरविण्यात येणाऱ्या कोळसा पुरवठ्यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत असल्याचे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अहवालाच्या अनुषंगाने तसेच वीज प्रकल्पाला निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरवून गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली असून त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२३-०३-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

कोराडी येथील कोळसा वाहतूक (Raw Coal) दरम्यान कोळसा वाहतूक ट्रक आदलाबदल करुन गैरव्यवहार करण्याचा प्रकार निर्दशनास आल्यानंतर मेसर्स कोहली रोड लाईन्स या कंत्राटदार कंपनीच्या विरुध्द महानिर्मितीच्या कोराडी औष्णिक वीज केंद्रामार्फत दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. उक्त तक्रारीवर पोलीस स्टेशन येथे प्रथम खबर अहवाल (एफआयआर) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ रोजी दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) संचालक (खनिकर्म) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात आलेल्या कार्यकारी संचालक (सं. व सु.-१), कार्यकारी संचालक (मा.तं.) आणि मुख्य व्यवस्थापक (सुरक्षा) यांच्या चौकशी समितीने त्यांचा चौकशी अहवाल दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी महानिर्मितीला सादर केला आहे.

उक्त चौकशी समिती अहवालाच्या अनुषंगाने या प्रकरणी सकृतदर्शनी दोषी आढळून येणाऱ्या कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता आणि दोन कनिष्ठ अधिकारी (सुरक्षा), यांना महानिर्मिती कंपनीच्या सेवेतून निलंबित करण्यात आलेले असून त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु आहे. तर, अवैध कोळसा वाहतूक प्रकरणी मेसर्स कोहली रोड लाईन्स या

कंत्राटदारास रुपये ३,००,९६८/- दंड ठोठावण्यात आला असून, उक्त कंत्राटदारास देण्यात आलेले काम दिनांक २९ सप्टेंबर, २०२१ रोजी स्थगित करण्यात आले असल्याचे महानिर्मितीने कळविले आहे.

---

## ओबीसी भटके-विमुक्त गुणवंत विद्यार्थ्यांच्या हितासाठी स्थापन करण्यात महाज्योती या प्रशिक्षण संस्थेतील न्यायहक्कासाठी शासनाने ठोस भूमिकाघेणे बाबत

**(१८) ११२२९ (१९-११-२०२१) श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओबीसी भटके-विमुक्त गुणवंत विद्यार्थ्यांच्या हितासाठी स्थापन केलेल्या महाज्योती या प्रशिक्षण संस्थेतील अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक यांच्या वेळकाढू धोरणामुळे पीएचडीसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती (फेलोशीप) साठी प्रतिक्ष करावी लागत असून सन २०१७ मध्ये नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची प्रबंध जमा करण्याची वेळ आली तरी त्यांना अद्यापही महाज्योतीची अधिछात्रावृत्ती मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,शासनाने मागील आर्थिक वर्षात महाज्योतीच्या योजनांवरील खर्चाची मर्यादा १५५ कोटी केली, तरी केवळ साडेतीन कोटी रुपये खर्च करण्यात आले परिणामत: इतर मंजूर निधीचा विनयिोग न केल्यामुळे तसेच शासनाच्या आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे व अपारदर्शकपणामुळे १२५ कोटीचा निधी शासनाकडे वर्ग झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,महाज्योतीची बैठक दरमहा होणे अपेक्षित आहे परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे व्यवस्थापकीय संचालक पाच ते सहा महिन्यांच्या अंतराने बैठक घेतात, महाज्योतीच्या बैठका वारंवार पुढे ढकलण्यात येत असून गत वर्षात केवळ तीन बैठका झाल्या असून पीएचडी करणारे विद्यार्थी वर्षभरापासून अधिछात्रवृत्तीची प्रतिक्षा करत असून योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत दहा महिन्यांत महाज्योतीचे कामकाज व योजना प्रत्यक्षात न राबता केवळ कागदावरच राबविली जात असून महाज्योती योजनेच्या नियमाप्रमाणे १६ अधिकारी कर्मचारी यांचा कार्यभार मंजूर असून तो कार्यरत करण्यासाठी शासन स्तरावर कोणताही प्रयत्न करण्यात आला नसून यात व्यवस्थापकीय संचालक पद हे देखील पूर्णवेळ कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, ज्या दिवशी विद्यापीठात पीएचडीसाठी नोंदणी होते त्या तारखेपासून बार्टी संस्थाअधिछात्रवृत्ती देते. महाज्योतीने किमान दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी पासून वा त्या सुमारापासून छात्रवृत्ती द्यावी तसेच नियमित विद्यार्थी आणि नोकरी, व्यवसाय करुन पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्याबाबतही संचालक मंडळाने तातडीने निर्णय निश्चित करणे आवश्यक आहे अशी विद्यार्थी संघटनानी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पीएचडीच्या विद्यार्थ्यांवरील नाहक होणारा अन्याय विनाविलंब दूर करुन महाज्योतीचा करभार यापुढे नियमित व सुरळीत होण्याच्या दृष्टीने कोणता ठोस निर्णय घेतला आहे?

**श्री.विजय वडेट्टीवार (०८-०३-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

कोरोना साथीचा काळ वगळाता संचालक मंडाळाच्या बैठका दरमहा नियमित होत आहेत.

(४) हे खरे नाही.

महाज्योतीमार्फत JEE/NEET/MHTCET, UPSC व MPSC चे ऑनलाईन प्रशिक्षण वर्ग नियमितपणे सुरू आहे. तसेच पीएचडी व एम फिल करीता लाभार्थ्यांचे निवड करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच व्यवस्थापकीय संचालकाच्या पदावर नियमित नियुक्ती करण्यात आलेली असून इतर आवश्यक पदावर कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) हे खरे आहे.

(६) विद्यार्थ्यांना सादर केलेली कागदपत्रे पडताळून/तपासणी करुन तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करुन त्या तात्पुरत्या निवड यादीवर आक्षेप मागविण्यात आलेले होते. प्राप्त झालेले सर्व आक्षेप महाज्योतीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आले, परंतु विधानपरिषदेच्या निवडणुकाकरीता आदर्श आचारसंहिता लागू असल्याने त्यावर निर्णय झालेला नाही. आदर्श आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर संचालक मंडळात त्यावर चर्चा करुन विहित नियमानुसार उचित निर्णय घेण्यात येईल.

---

## कृषिकर्जाच्या वाटपात गैरव्यवहार केलेल्या बँकांवर करवाई करण्याबाबत

**(१९) ११२३४ (१९-११-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मराठवाड्यासाठी चालू हंगामात ७२५२ कोटी रुपयांच्या कृषिकर्जाचे उद्दिष्ट्य ठेवले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चालू हंगामात दिनांक १० सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास मराठवाड्यात केवळ ४० टक्के म्हणजेच २८७० कोटी रुपयांच्या कृषिकर्जाचे वाटप झाले आहे. हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषी कर्ज वाटपात बेजबाबदारपणा करणाऱ्या बँकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०३-०३-२०२२)** : (१) व (२) हे खरे नाही.

(३) खरीप हंगाम २०२१-२२ करीता मराठवाड्यास रुपये ११०३२.७० कोटीचा लक्षांक असून एकूण ११.४२ लाख सभासदांना ७३८०.०७ कोटीचे कर्जवाटप केलेले आहे. हे प्रमाण एकूण लक्षांकाच्या ६८ % इतके आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी उपयोजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या लेखाशिर्षाचे प्लॅन टू नॉन प्लॅन वर्गीकरण करण्याबाबत

**(२०) ११३१७ (२४-११-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.सुरेश धस, श्री.प्रवीण दटके, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी उपयोजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना प्लॅन टू नॉन प्लॅन न झाल्यामुळे ३६ शालेय शिक्षण विभागांतर्गत सुरू असलेले (टीएसपी प्लस) लेखाशीर्ष २२०२ एच ९७३, आदिवासी सैनिकी शाळा लेखाशीर्ष २२०२/१९०१, माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा लेखाशीर्ष २२०२/१९४८, या लेखाशिर्षांमधून वेतन काढण्यात येत असून सदर लेखाशिर्षांतर्गत येणाऱ्या शाळा व तुकड्या नॉन प्लॅन मध्ये समाविष्ट झालेल्या नाहीत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव सन २०१९ रोजी पासून प्रलंबित ठेवण्यात आलेलेआहेत तसेच निधीअभावी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक २८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निवेदन देवून सैनिकी शाळेतील आदिवासी तुकडीवर कार्यरत शिक्षक/कर्मचाऱ्यांचे वेतन प्लॅन मधून नॉन प्लॅनमध्ये रूपांतरीत करण्याची विनंती केली हे खरे आहे काय,

(४) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लेखाशिर्षाचे प्लॅन मधून नॉन प्लॅनमध्ये वर्गीकरण होणे अपेक्षित असूनही अद्यापपर्यंत लेखाशिर्षाचे वर्गीकरण प्रलंबित ठेवणाऱ्या संबधिंतांवर शासनाने कारवाई करुन लेखाशीर्ष वर्गीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०६-०३-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय. अशा आशयाची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

(४) विषयांकित बाबी कार्यक्रम खर्चांतर्गत (प्लॅन) समाविष्ट असल्यामुळे आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला एकूण वार्षिक मागणीच्या प्रमाणात तरतूद करण्यास मर्यादा येतात. तथापि, पुरवणी मागणीद्वारे वाढीव नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येतो व निधीअभावी शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवण्यात येत नाही. तसेच विषयांकित योजनेवरील खर्च अनिवार्य खर्चांतर्गत समाविष्ट करण्याबाबत प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.